# बैठकीचे इतिवृत्त

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०२०/प्र.क्र.८९/२०/ शिक्षण-१ दि.१३.१२.२०२२ अन्वये ए.एन.एम., जी. एन.एम. व इतर परिचर्या पदविका अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांचे शिक्षण शुल्क निर्धारित करण्यासाठी "शिक्षण शुल्क समिती" गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक दि.०५.०५.२०२५ रोजी आयुक्त, (वैद्यकीय शिक्षण) यांच्या अध्यक्षतेखाली आयुक्त, वैद्यकीय शिक्षण, मुंबई, यांच्या दालनात दुपारी ३.०० वाजता आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीत खालील अधिकारी उपस्थित होते:-

१) संचालक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ ,मुंबई.
२) उप सचिव तथा सदस्य सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई.
३) अधिक्षिका, शुश्रुषा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.
४) प्रबंधक, महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ.मुंबई
५) सहाय्यक संचालक, लेखा, वैद्यकिय शिक्षण व संशोधन, मुंबई.
६) श्री. कैलास गांधी निमंत्रित सनदी लेखापाल
७) श्रीमती. वैशाली बापट निमंत्रित परिव्यय लेखापाल

उपरोक्त बैठकीत उपस्थित मुद्दे व त्यावरील देण्यात आलेले निर्देश पुढीलप्रमाणे आहेत:-

| अ. क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| १ | शै.व .२०२४ - २५ साठी दाखल प्रस्तावाचा गोषवारा | शै.व .२०२४ - २५ साठी दाखल प्रस्तावाचा गोषवारा खालील प्रमाणे सादर केला .<br>एकूण संस्था -१०७६<br><br>A) एकूण ऑनलाइन प्रस्ताव सादर No upward -४१२<br>B) एकूण ऑनलाइन प्रस्ताव सादर (upward) - ४१४<br>C) एकूण ADHOC पात्र संख्या - ४०७<br>D) अद्यापि सादर न झालेल्या प्रस्तावाची संख्या - ०५७<br>एकूण अभ्यासक्रम(A+B+C+D) = १२९०<br>(एएनएम -०७१४, जीएनएम- ०५७६) | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

| अ. क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| | | B१) हार्ड कॉपी जमा न केलेले प्रस्ताव - ०८<br>B२) मंजूर प्रस्ताव - ३१६<br>B३) त्रुटी प्रस्ताव बाकी - ०४<br>B४) छाननी करिता शिल्लक प्रस्ताव -०८६<br>एकूण ऑनलाइन प्रस्ताव सादर (upward) - ४१४<br>परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समितीकडे सादर न केलेल्या संस्थांची यादी महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ यांना सादर करावी व मंडळाने याबाबत नियमानुसार उचित कार्यवाही करावी असे मा. अध्यक्षांमार्फत सूचित करण्यात आले. | महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व परावैद्यक शिक्षण मंडळ, मुंबई. |
| २ | शै.व.२०२४-२५च्या सात (७) शिक्षण शुल्क प्रस्तावांचे पुनर्विलोकन (REVIEW) करणे. | शै.व.२०२४-२५च्या सात (७) शिक्षण शुल्क प्रस्तावांचे पुनर्विलोकन करण्यासाठी आलेल्या संस्थाप्रमुख (प्रतिनिधीचे ) शेरे लक्षात घेऊन व त्रुटि संदर्भातील सर्व कागदपत्राचा अभ्यास करून पुढील बैठकीत निर्णय दिला जाईल . | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ३. | शै.व. २०२४ -२५ च्या सहा (६) शिक्षण शुल्क प्रस्तावांचे पुनर्विलोकन प्रस्ताव मंजुरीसाठी सादर (REVIEW). | शै.व.२०२४-२५च्या सात (७) शिक्षण शुल्क प्रस्तावांचे पुनर्विलोकन करण्यासाठी आलेल्या संस्थाप्रमुख (प्रतिनिधीचे ) शेरे लक्षात घेऊन व त्रुटि संदर्भातील सर्व कागदपत्राचा अभ्यास करून पुढील बैठकीत निर्णय दिला जाईल . | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ४ | शिक्षण शुल्क समितीचा अहवाल शासनास सादर करणेबाबत | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समितीचा कार्य पूर्तता अहवाल शासनास अवलोकनार्थ पाठविण्याकरीता तयार करून समितीचे मा. अध्यक्ष व मा. सदस्य सचिव यांच्या संयुक्त स्वाक्षरीने शासनास सादर करण्यात यावा, असे ठरविण्यात आले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

परिचर्या पदविका अभ्यासक्रम शि... समिती

| अ.क्र | मुद्दा | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| ५ | शै.व.२०२४-२५ साठी संस्थाना प्रस्ताव भरण्यासाठी मुदतवाढ देण्याबाबत चर्चा व मंजूरी | शै.व.२०२४-२५ साठी प्रस्ताव सादर न केलेल्या संस्थाना प्रस्ताव भरण्यासाठी दि .०६/०५/२०२५ ते २०/०५ /२०२५ पर्यंत रुपये ५०,०००/- प्रति कोर्स दंडासहित मुदतवाढ करण्याचे ठरविले आहे . | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ६. | शिक्षण शुल्क प्राधिकरण यांनी पाठविलेल्या पत्रावर चर्चा. | शिक्षण शुल्क प्राधिकरण यांनी साईराम स्कूल ऑफ नर्सिंग, नागपूर या महाविद्यालयाचे शै.व.२०२१-२२ साठी प्रस्ताव सादर करण्याकरिता वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली होती, परंतू सदर महाविद्यालयाने विहित मुदतीत प्रस्ताव सादर केलेला नसून शुल्क निश्चित केलेले नाही. तरी सदर शुल्क परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समितीने मंजूर करावे यासंदर्भात शासनास अवगत करण्यात यावे असे सर्वानुमते ठरविण्यात आले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ६. | Private nurses Association यांनी पाठविलेल्या पत्रावर चर्चा. | Private nurses Association यांनी पाठविलेल्या पत्रातील मुद्यांवर चर्चा झाली. प्रत्येक मुद्यांवर आधारित स्पष्टीकरण तयार करून त्यासंदर्भातील पत्र असोसिएशनला पाठविण्यात यावे. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ७. | निमंत्रित सनदी लेखापाल व परीव्यय लेखापाल यांना कार्यानुभव प्रमाणपत्राबाबत. | निमंत्रित सनदी लेखापाल व परीव्यय लेखापाल यांना कार्यानुभव प्रमाणपत्राबाबत मसुदा तयार करून सर्व संमतीने देण्यास हरकत नाही असे ठरविण्यात आले. | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |
| ८. | जनता राजा बहुद्देशीय समाज कल्याण संस्था संचालित लेट. एस. डी. मस्के स्कूल ऑफ नर्सिंग, हिंगोली यांच्या | जनता राजा बहुद्देशीय समाज कल्याण संस्था संचालित लेट. एस. डी. मस्के स्कूल ऑफ नर्सिंग, हिंगोली यांच्याकडून शै.व. २०२३-२४ च्या शिक्षण शुल्क मंजूरी करीता शुल्क समितिकडे दिलेल्या विहित वेळेत कोणत्याही | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

| अ. क्र | मुद्या | बैठकीत झालेले निर्णय | कार्यवाही करणारी यंत्रणा/कार्यालय व कालावधी |
|---|---|---|---|
| | शै.व.२०२३-२४ च्या शिक्षण शुल्क मंजूरीकरीता सादर पत्रावर चर्चा. | प्रकारचा प्रस्ताव सादर करण्यात आलेला नाही. तसेच शै.व. २०२३-२४ या वर्षातील फी मंजूरी संदर्भातील ऑनलाइन पोर्टल लिंक यापूर्वीच विहित वेळेनंतर बंद करण्यात आलेली आहे. या कारणास्तव सदर संस्थेच्या अर्जाचा विचार करणे शक्य नाही असे ठरविण्यात आले. | |
| ९. | शै.व.२०२४-२५ No upward revision प्राप्त झालेल्या संस्थाच्या प्रस्तावाचे शिक्षण शुल्क मंजुरीसाठी सादर. | शै.व.२०२४-२५ No upward revision प्राप्त झालेल्या एकूण ०६ संस्थाचे प्रस्ताव मान्य करण्यात आले . | परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती |

<u>No Upward Revision</u>

<u>ए.एन.एम. व जी.एन.एम. अभ्यासक्रम</u>

| Sr No. | Institute code | Institute Name | Stream | Tution Fee | Development Fee | Final Fee For A.Y.२०२४-२५ | Status |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | ०७५५ | यशवंत इंस्टीट्यूट ऑफ नर्सिंग स्कूल , हिंगोली | ANM | ४७०५९ | ४९४१ | ५२००० | NO UPWARD STATUS |
| २ | १०३८ | व्ही.बी.एन. नर्सिंग स्कूल , हिंगोली | ANM | ५७०१३ | ५९८७ | ६३००० | |
| ३ | ०५९ | वेस्टर्न महाराष्ट्र स्कूल ऑफ नर्सिंग तिळवणी, कोल्हापूर | ANM | ३६१९९ | ३८०१ | ४०००० | |
| ४ | ०९६९ | संभाजीराव केंद्रे नर्सिंग स्कूल, उदगीर, लातूर | GNM | ३२७२७ | ३२७३ | ३६००० | |

परिचर्या पदविका अभ्यासक्रम शिक्षण शुल्क समिती

| Sr No. | Institute code | Institute Name | Stream | Tution Fee | Development Fee | Final Fee For A.Y.२०२४-२५ | Status |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ५ | ००३६ | आयडियल नर्सिंग स्कूल, कणकवली, सिंधुदुर्ग | ANM | १९०९१ | १९०९ | २१००० | NO UPWARD STATUS |
| ६ | ११५७ | श्रेया नर्सिंग स्कूल, कळवण,नाशिक | ANM | ४५४५४ | ४५४६ | ५०००० | |

समितीची पुढील बैठक आयुक्त तथा अध्यक्ष यांच्या आदेशानुसार सूचित करण्यात येईल. उपस्थितांचे आभार मानून बैठक संपन्न झाली.

प्रबंधक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा
व परावैद्यक शिक्षण मंडळ
तथा सदस्य

अधिक्षिका,
शुश्रुषा, वैद्यकिय शिक्षण व
संशोधन, तथा सदस्य

सहाय्यक संचालक,
लेखा, वैद्यकिय शिक्षण व
संशोधन, तथा सदस्य

संचालक,
महाराष्ट्र राज्य शुश्रुषा व
परावैद्यक शिक्षण मंडळ
तथा सदस्य

उप सचिव,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग
तथा सदस्य सचिव

आयुक्त (वैद्यकीय शिक्षण),
तथा अध्यक्ष